जन्म कल्याणक महोत्सव

# दुनिया को महाविनाश से बचाने के लिए भगवान महावीर के सिद्धांतों को आत्मसात करें

**पत्रिका न्यूज़ नेटवर्क**
patrika.com



कोल्हापुर में शिवाजी विश्वविद्यालय के शिव वार्ता वाहिनी में महावीर जयंती कार्यक्रम को संबोधित करते डॉ. वी.बी. ककडे। साथ में डॉ. आलोक जत्राटकर।

**कोल्हापुर**. शिवाजी विश्वविद्यालय के भगवान महावीर अध्ययन के समन्वयक डॉ. वी.बी. ककडे ने कहा कि दुनिया को महाविनाश से बचाना है तो भगवान महावीर के सिद्धांतों को आत्मसात करना चाहिए। वे भगवान महावीर जयंती के उपलक्ष्य में शिवाजी विश्वविद्यालय के शिववार्ता संवाद कार्यक्रम में महावीर या महाविनाश विषय पर बोल रहे थे। उनसे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर ने बात की।

डॉ. ककडे ने कहा कि प्राकृतिक संपत्ती का अत्यधिक दोहन, सत्ता संघर्ष, संपत्ति का केंद्रीकरण ऐसे कई कारणों से दुनिया विनाश की ओर बढ़ है। इस विनाश से दुनिया को बचाना है तो भगवान महावीर के सत्य, अहिंसा, अस्तेय और अपरिग्रह इन सिद्धांतों को आत्मसात करना चाहिए। भगवान महावीर ने किसी देव और व्यक्ति की पूजा नहीं की। उन्होने हमेशा मानवीय मूल्यों की उपसना की है। साथ ही में सम्यक दर्शन, सम्यक ज्ञान और सम्यक चारितार्थ को सभी को अपनाना चाहिए।

शिवाजी विश्वविद्यालय के भगवान महावीर अध्ययन के बारे में जानकारी देते हुए डॉ. ककडे ने कहा कि जैन धर्म के 24 तीर्थंकर और उनका योगदान, सिख की जानकारी लोगों तक पहुंचाने के लिए अध्ययन की ओर से 24 किताबों का विमोचन किया गया है, जिसे अच्छी प्रतिक्रिया मिली है। कुलपति डॉ. डी.टी. शिर्के की प्रेरणा से अध्ययन सलाहकार समिति का गठन किया है। इसमे गैर जैन बंधुओं को भी शामिल किया है। अध्ययन की ओर से जैन शास्त्र की डिग्री और प्रमाणपत्र कोर्स चलाए जाते हैं।

सकाळ

# शिवाजी विद्यापीठात पोलिसांसाठी कोविड सेंटर

कोल्हापूर, ता. २६ : पोलिस अधिकारी, अंमलदार व त्यांच्या कुटुंबीयांसाठी शिवाजी विद्यापीठ येथे आजपासून कोविड सेंटर सुरू केले आहे. त्यामध्ये १०० बेडची व्यवस्था असून २० ऑक्सिजन बेडची व्यवस्था आहे. त्यामध्ये लागणारी औषधे, पौष्टिक आहार, ग्रामीण भागातून बाधित अधिकारी-अंमलदार व त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींना आणण्यासाठी रुग्णवाहिकेची व्यवस्था आहे. पोलिस अधीक्षक शैलेश बलकवडे यांनी पाठपुरावा करून हे सेंटर सुरू केले आहे.

सेंटरमध्ये सर्व सुविधा विनामूल्य आहेत. दैनंदिन लक्ष केंद्रित करण्यासाठी पोलिस अधिकारी-अंमलदार व त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींना तत्काळ मदत मिळण्यासाठी पोलिस अधीक्षक कार्यालयात विशेष कक्ष स्थापन केला आहे. येथे पोलिस निरीक्षक दर्जाचे अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. बाधित झालेल्या पोलिस अधिकारी - अंमलदार व त्यांच्या कुटुंबातील व्यक्तीची प्रकृती गंभीर झाल्यास त्यांना तत्काळ योग्य ते उपचार उपलब्ध होण्यासाठी खास व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच पोलिस अधीक्षक शैलेश बलकवडे यांनी प्रत्येक पोलिस अधिकरी व अंमलदार यांना सॅनिटायझर बॉटल्स दिल्या.

Kolhapur, Main
27/04/2021 Page No. 3

तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठाच्या ऑनलाईन परीक्षा सुरू

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील ऑक्टोबर- नोव्हेंबर २०२० च्या परीक्षा दि.२२ मार्च २०२१ पासून सुरू झाल्या. या परीक्षा या ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येत आहेत.सोमवारी झालेल्या परीक्षेसाठी २८ हजार ३९५ विद्यार्थ्यांपैकी २८ हजार ३३ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने परीक्षा दिली. विद्यार्थ्यांना येणाऱ्या तांत्रिक अडचणींचे निराकारण विविध माध्यमातून करण्यासाठी विद्यापीठ परीक्षा विभाग तसेच सॉफटवेअर पुरवठादार कंपनीची यंत्रणा कार्यरत करण्यात आली होती. अशी माहिती शिवाजी विद्यापीठातर्फे देण्यात आली आहे.

# विद्यापीठ ऑनलाईन परीक्षेसाठी २८ हजार विद्यार्थी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षेंतर्गत सोमवारी २८ हजार ३९५ पैकी २८ हजार ३३ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने परीक्षा दिली.

विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२० च्या परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येत आहेत. बी.एस्सी. - बायोटेक, बी.एस्सी. - आय.टी., बी.एस्सी. - शुगरटेक, बी.एस्सी. - संगणकशास्त्र, बीबीए, बीसीए, बीएसडब्ल्यू, बीआयडी, बीएफटीएम, बी.व्होक. एम.ए., बी.डी.एस., एम.सी.ए., बी.ए., बी.एस्सी., एम.एस्सी. अभ्यासक्रमाच्या सोमवारी परीक्षा सुरळीतपणे झाल्या आहेत, अशी माहिती परीक्षा विभागाच्या वतीने देण्यात आली.